# **प्रतिज्ञापत्र**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, **" श्री समर्थ रामदासांच्या प्रपंच विज्ञानाचे स्वरुप "** ही शोध प्रबंधिका मी स्वतः संशोधित केली असून यापूर्वी ही कोणत्याही विद्यापीठीय स्तरावर कोणतीही पदवी व पदविका मिळविण्यासाठी सादर करणेत आलेली नाही.

ठिकाण : सांगली

दिनांक : २५/१२/९४.

कु. मीनाक्षी वि गोरे.

**(कु. मीनाक्षी विनायक गोरे)**

**(संशोधक)**

# प्रमाणपत्र

प्रस्तुत प्रबंधिकेत कु. मीनाक्षी विनायक गोरे यांनी **" श्री समर्थ रामदासांच्या प्रपंच विज्ञानाचे स्वरुप "** या विषयाचा अभ्यास मांडला आहे. त्यांनी ही लघुशोध प्रबंधिका माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केली आहे. ती यापूर्वी कोणत्याही विद्यापीठीय स्तरावर पदवी मिळविण्यासाठी उपयोगात आणलेली नाही.

ठिकाण : सांगली

दिनांक : २५।१२।९४

(प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी)
(संशोधन मार्गदर्शक)

# ऋ ण नि र्दे श


महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून आपण प्राध्यापिका व्हायचे असे मला मनोमन वाटत होते. त्यादृष्टीने शैक्षणिक वाटचाल म्हणून मी एम्. फील. करण्याचे ठरविले. त्यासाठी मला श्री समर्थ रामदासस्वामींच्या लेखनाचा अभ्यास करण्याचा योग आला. सुदैवाने हा विषयही माझ्या अत्यंत आवडीचा आहे.

अगदी लहानपणापासून समर्थांचे बोल घरातील सांस्कृतिक वातावरणामुळे माझ्या मनात रुजले असल्याने, या शोधप्रबंधिकेसाठी मला त्याचा खूपच उपयोग झाला. समर्थांचे उत्तुंग व्यक्तिमत्व, त्यांचे प्रचंड कार्य आणि त्यांचे समर्थ वाङमय माझ्या श्रध्देचा, आदराचा आणि अभ्यासाचा विषय ठरला. त्यांच्यावरील श्रध्देमुळे आणि प्रगाढ आदरामुळे हे सारे माझ्या हातून लिहिले गेले.

याचबरोबर या लघुशोध प्रबंधिकेसाठी माझे मार्गदर्शक **प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी** हे संत वाङमयाचे गाढे व्यासंगी तज्ञ, अनुभूतीसंपन्न आचार्य असून त्यांनी मला वेळोवेळी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी हे मार्गदर्शन गुरु व पिता या दुहेरी नात्याने केले आहे, अशी माझी श्रध्दायुक्त आदराची भावना आहे. त्यामुळे त्यांचे ऋण शब्दांच्या आभारात सामावणे कठीण आहे. तरी त्यांना व त्यांच्या सुविद्य पत्नी प्रा. डॉ. सौ. अनुराधा कुलकर्णी यांना प्रारंभी वंदन करुन त्यांचा विनम्रपणे निर्देश करीत आहे.

मराठीतील थोर समीक्षक माझे श्वसूर ती. स्व. श्री. गो. म. कुलकर्णी, प्रा. वैजनाथ महाजन यांच्याकडूनही मला खूपच मार्गदर्शन, प्रोत्साहन मिळाले. या अभ्यासासाठी मला वेळोवेळी लागणारी सर्व पुस्तके उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. पी. जे. ताम्हनकर व येथील ग्रंथपालांचे आभार मानते. तसेच विलिंग्डन कॉलेजचे व कस्तुरबाई वालचंद कॉलेजचे ग्रंथपाल यांचेही आभार मानते.

दिनांक :

**(कु. मीनाक्षी विनायक गोरे)**